## इन्फोग्राफिक

सचिन लुंगसे

# भुयारी मेट्रो एकदम भारी

दक्षिण मुंबईला पूर्व आणि पश्चिम उपनगराशी जोडणाऱ्या कुलाबा - वांद्रे - सीप्झ या भुयारी मेट्रो मार्गाचे काम वेगाने सुरू असून, आतापर्यंत संपूर्ण प्रकल्पाचे काम ८१.३ टक्के झाल्याचा दावा मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) केला आहे. महत्त्वाचे म्हणजे दक्षिण मुंबईतील विधानभवन, दक्षिण मध्य मुंबईतील सिद्धीविनायक या मेट्रो स्थानकांवर कॉर्पोरेशनचे विशेष लक्ष असून, सर्वच स्थानकांची कामे अत्याधुनिक पद्धतीने गुणवत्तापूर्ण करण्यावर भर दिला जात आहे.



### संपूर्ण प्रकल्पाची सद्यस्थिती

१

- सिव्हिल वर्क्स : १२.७ टक्के
- स्थानकांचे बांधकाम: ८९.७ टक्के
- भुयारी काम : १०० टक्के
- सिस्टीम वर्क्स : ५०.५ टक्के
- डेपोचे काम : ६२ टक्के
- मेनलाइन ट्रॅक : ६०.६ टक्के

२

### टप्पा १

| आरे ते बीकेसी | ओसीएस वर्क | ओव्हरऑल सिस्टीम | ओव्हरऑल स्टेशन | मेनलाइन ट्रॅक | स्टेशन, टनेल |
|---|---|---|---|---|---|
| ८७ % | ५७ % | ६४ % | ९२ % | ८५ % | ९७ % |

- आंध्र प्रदेशातील श्री सिटीमध्ये मेट्रोच्या कारखान्यात आठ डब्यांच्या मेट्रो तयार केल्या जात आहेत.
- मेट्रोच्या तिसऱ्या रेकचेही डबे मुंबईत दाखल झाले आहेत.
- मेट्रो प्रकल्पाचा पहिला टप्पा डिसेंबर २०२३ पर्यंत पूर्ण होईल.





### टप्पा २

३

- बीकेसी ते कफ परेड : ७६.८ टक्के काम पूर्ण
- स्टेशन आणि टनेल : १५.२ टक्के
- ओव्हरऑल स्टेशन : ८८.१ टक्के
- ओव्हरऑल सिस्टीम : ४२.२ टक्के
- ओसीएस वर्क : ४६.३ टक्के
- मेनलाइन वर्क : ४६.५ टक्के



- आरे येथील कारशेडमध्ये किमान २८ मेट्रो मावणार आहेत.
- एका गाडीतून अंदाजे २,४०० प्रवासी प्रवास करू शकतील.
- ८५ किमी प्रति तास अशा प्रत्यक्षातील प्रचालन वेगामुळे प्रवाशांचा एकूण प्रवासासाठी लागणारा वेळ कमी होईल.